**रे.दि.मु.नं.१७/२०१७**
**नि.क्र.१६४ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार मंदार प्रकाश शिंदे यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २६ तर्फे वकील श्रीमती. एस.ए.गिडये यांचेकडुन शपथेवर सुरु -**

१०. सन १९८४ साली माझा जन्म झाला. मी आज रोजी साक्ष देण्यापूर्वी दावा मिळकती संदर्भात असलेल्या सर्व महसुली नोंदी पाहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत क्र. १ ते ८ या मिळकती १९५५ साली प्रतिवादी क्र. १ चे वडील यांच्या नावे रेकॉर्ड ऑफ राईट अस्तित्वात आल्यानंतर कुळाच्या नावे फेरफार नोंद क्र. ७६१ अन्वये दाखल झाल्या. हे म्हणणे खरे आहे की या दिवाणी प्रकरणात फेरफार नोंद क्र. ७६१ (नि. १८९) हजर केलेली आहे. मी, माझे वडील , त्यांचे भाऊ किंवा माझे आजोबा यांनी या नि. १८९ च्या फेरफारी विरूध्द अपिल केले नाही यावर माझे म्हणणे की, जोपर्यत विक्री झाली नव्हती, तोपर्यत केले नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की फेरफार नोंद ७६१ आजतागायत विना आव्हानीत आहे. हे म्हणणे खरे आहे की १९५८ साली प्रतिवादी क्र. १ चे वडील यांचा वारस तपास होवून वारस रजिस्टर नंबर ७५ प्रमाणे फेरफार नंबर ९४० अनुसार त्या मिळकतींना सोनू गोपाळ शिंदे यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र. १ चे नाव लावले. हे म्हणणे खरे आहे की फेरफार नोंद ९४० आजतागायत विना आव्हानीत आहे. हे म्हणणे खरे आहे की गोविंद गोपाळ शिंदे हे जन्मापासून मृत्यूपर्यत कोंडगाव येथे स्थायीक होते. हे म्हणणे खरे नाही की गोविंद गोपाळ शिंदे यांनी काही काळ संगमेश्वर तालुक्यात तलाठी म्हणून काम केले असून ती बाब माझ्या वडीलांना मान्य होती.

१२. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत अनु. क्र. १ ते ८ या मिळकतींची कुळकायदयाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ला विक्री झालेली आहे. हे मला सांगता येणार नाही की विक्री झाल्याबाबत प्रतिवादी क्र. १ कडे कलम ३२म चे प्रमाणपत्र आहे अगर कसे.

**प्रश्न -** दावा मिळकत अनु. क्र. १ ते ८ या मिळकतींची कुळ कायदयाअंतर्गत प्रतिवादी क्र.१ च्या नावे झालेली विक्री आजतागायत मी, माझे वडील व आजोबांनी आव्हानीत केलेली नाही.?

**उत्तर -** आमचे एकत्र कुटुंब असल्याने ती विक्री माझ्या वडीलांनी किंवा आजोबांनी किंवा मी आव्हानीत केली नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की एकत्र कुटुंब असल्याने ती विक्री आजतागायत मी माझ्या वडीलांनी किंवा आजोबांनी आव्हानीत केली नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. १ ची मुलखी दफ्तरी एकत्र कुटुंब प्रमुख अशी नोंद नाही. हे मला सांगता येणार नाही की दावा मिळकतीच्या आकारफोड पत्रकाला किंवा गुणाकार बुकाला प्रतिवादी क्र. १ चे वडील यांचे एकटयाचे नाव दाखल आहे.

१४. हे मला सांगता येणार नाही की माझ्या वडीलांनी ALT/12/XIII/VIII/852 of 1972 या कुळ अर्जाविरूध्द अपिल दाखल केले होते. हे मला माहिती नाही की माझ्या वडीलांनी दाखल केलेले कुळ अपिल मुदतीत दाखल न केल्यामुळे ते नामंजूर झाले. याची मला माहिती नाही की माझ्या वडीलांनी कुळ अपिल दावा दाखल केल्यानंतर दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी दावा दाखल करण्यापूर्वी कोणत्या गोष्टी केल्या अगर केल्या नाहीत यांची मला माहिती नाही. मी साक्ष देण्यापूर्वी या दाव्यासंदर्भात माझ्या

वडीलांकडे चर्चा केली होती.

१५. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. १ कायमस्वरूपी कोंडगाव येथे राहतात. हे मला माहिती नाही की प्रतिवादी क्र. १ चे वडील देखील कोंडगाव येथे रहायचे. माझे वडील कायमस्वरूपी मुंबईमध्ये स्थायीक होते यावर माझे म्हणणे की, दहावी पर्यत त्यांनी कोंडगाव येथे शिक्षण घेतले व त्यांनतर कामानिमीत्त ते मुंबईत रहायला गेले.

१६. हे मला सांगता येणार नाही की स्थावर मिळकत स. नं. ७/२ यांची मालकी देखील प्रतिवादी क्र. १ यांच्याकडेच आहे. हे मी सांगू शकत नाही की, स.नं. ७/२ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ने कुळकायदया अंतर्गत विकत घेतली असता ती मिळकत कुळ कायदयाखाली आवश्यक परवानग्या घेवून प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. १३ ते १६ यांचे पूर्वाधिकारी प्रमोद शिंदे म्हणजे माझे चुलते यांना रजिस्टर खरेदीखताने विकत दिली. हे मला सांगता येणार नाही की सदरचे खरेदीखत आजतागायत आव्हानीत झालेले नाही. मी किंवा माझ्या वडीलांनी आजतागायत त्या खरेदीबाबत हरकत घेतलेली नाही हे म्हणणे खरे आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की स. नं. ७/२ मध्ये प्रमोद शिंदे यांनी स्वत:चे घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की या दाव्यामध्ये स. नं. ७/२ ही मिळकत समाविष्ट नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांनी कुळ कायदयाखाली झालेल्या विक्रीच्या विरूध्द अपिल उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांच्याकडे दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की ते अपिल विलंबाच्या तांत्रीक मुद्दयावर फेटाळण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की आम्ही आजतागायत महसुली न्यायालयात त्या अपिलाविरूध्द दाद मागितली नाही.

१८. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. २६ ने दि. २९/०५/२०१५ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने दावा मिळकत अनु. क्र. ८ (स. नं. ५/२) ही मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडून पूर्व परवानगी घेवून विकत घेतलेली आहे. हे मला माहिती नाही की दावा मिळकत अनु. क्र.८ मध्ये प्रतिवादी क्र. २६ यांचे वडीलांनी बांधलेले घर नंबर ५२६ होते. हे मला माहिती नाही की प्रतिवादी क्र. २६ त्यांच्या कुटुंबियासोबत त्या घरात रहात होते. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. २६ ने सक्षम अधिका-यांची परवानगी घेवून त्या जागेमध्ये नविन घर बांधलेले आहे.

१९. मी मा. जिल्हाधिका-यांनी दिलेल्या परवानगीच्या विरूध्द कुठेही आव्हानीत केलेले नव्हते. हे मला माहिती नाही की माझ्या वडीलांनी देखील २०१५ सालच्या या जिल्हाधिका-यांच्या परवानग्या रद्द करून घेतल्या नाहीत. हे मला माहिती नाही की माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २६ यांना खरेदी दिल्यानंतर त्या संदर्भात झालेल्या फेरफार नोंद ८६३९ विरूध्द दाखल झालले अपिल रद्द झाल्यानंतर पुढे तजवीज केली नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. २६ चे नाव दावा मिळकत अनु.क्र. ८ च्या सातबारा सदरी आजतागायत कायम आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. २६ त्यामुळे अनु.क्र. ८ च्या मिळकतीचा एकटा मालक झालेला आहे.

२०. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांनी अथवा मी प्रतिवादी क्र. २६ चे दावा मिळकत अनु. क्र. ८ मध्ये असलेले जुने घर असल्याबाबत कुठेही दावा दाखल करेपर्यत तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी मी माझ्या वडीलांच्या वतीने साक्ष देत आहे.

२१. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत अनु.क्र. १ ते ८ या मिळकती

माझ्या आजोबांनी त्यांचे व प्रतिवादी क्र. १ ते २५ चे एकत्र कुटुंबाकरीता कुळकायदयानुसार संपादीत केल्या आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत अनु. क्र. ९ ते १२ या माझ्या आजोबांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून अनंत व गंगाराम या त्यांच्या भावासाठी संपादन केल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर कुटुंब माझ्या पणजोबाच्या वेळेपासून सन २०१० साली माझे आजोबा मयत झाले तोपर्यत एकत्र रहात होते, एकत्र जेवणखाण करीत होते, व शेती एकत्र करीत होते हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी पुराव्यात दिला नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परि. १ मधील माझ्या आजोबाच्या मृत्यू नंतर ----------- माझे वडीलांनी या कोर्टात दावा आणलेला आहे पर्यतचा सर्व मजकूर खोटा आहे.

२३. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परि. २ मधील कृषक दिनापूर्वी प्रतिवादी क्र. १ चे वडील----------त्यानंतर वादाच्या मुळावर घाव घालण्याच्या दृष्टीने माझ्या वडीलांनी हा वाटपासाठी दावा आणला आहे पर्यतचा सर्व मजकूर खोटा आहे.

२४. हे म्हणणे खरे आहे की मी दावा मिळकत अनु. क्र. ९ ही अनंत यास एकटयास माझ्या आजोबांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून जमिन खरेदी करून त्याच्या नावावर करून दिल्याबाबत आजपर्यत न्यायालयात कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की मी तो हजर करू शकतो.

२५. हे म्हणणे खरे आहे की गंगाराम यासही माझ्या आजोबांनी दावा मिळकत क्र. १० ते १२ या एकत्र कुटुंबातील त्याच्या हिश्यापोटी एकत्र कुटुंबातील

उत्पन्नातून खरेदी करून दिल्याबाबत आजतागायत मी किंवा माझ्या वडीलांनी या न्यायालयात कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

२६. हे म्हणणे खरे आहे की गणपत यास त्याच्या व्यावसायीक कारणामुळे १९६२ साली माझ्या आजोबांनी रक्कम रू. ३०,०००/- एकत्र कुटुंबातील त्याच्या हिश्यापोटी दिले व त्याची नड भागविली, त्यामुळे त्यांच्या वारसांना दावा मिळकतीत हिस्सा मिळणार नाही व दयायचा झाल्यास वरील रक्कम व्याजासहित त्याला माझ्या वडीलांना एकत्र करावी लागेल असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी किंवा माझ्या वडीलांनी आज रोजी न्यायालयात दाखल केला नाही.

२७. हे म्हणणे खरे नाही की परि.२ मधील, त्यापैकी अनंत यास पासून -----------माझ्या वडीलांचा त्याच्या भावाबहीणीसह एकूण अर्धा हिस्सा आहे हे मी खोटे सांगत आहे.

२८. हे म्हणणे खरे नाही की परि. ३ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

२९. हे म्हणणे खरे नाही की परि.४ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

३०. हे म्हणणे खरे नाही की परि.५ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

३१. हे म्हणणे खरे नाही की परि.६ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

३२. हे म्हणणे खरे नाही की परि.७ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

३३. हे म्हणणे खरे नाही की परि.८ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

३४. हे म्हणणे खरे नाही की परि.९ मधील सर्व मजकूर खोटा आहे.

३५. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत क्र. १ ते ८ शी माझ्या

वडीलांचा अगर माझा कोणताही हक्क संबंध नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत अनु.क्र. १ ते ८ या प्रतिवादी क्र. १ च्या एकटयाच्या मालकी वहिवाटीच्या होत्या व आहेत. हे म्हणणे खरे नाही की कुळकायदयाअंतर्गत झालेल्या कोणत्याही निर्णयाबाबत माझ्या वडीलांना हस्तक्षेप करता न आल्याने प्रतिवादीविरूध्द हा खोटा दावा दाखल केला आहे.

३६. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी दावा मिळकतींची किंमत वाढल्याने हव्यासापोटी प्रतिवादीविरूध्द माझ्या वडीलांनी खोटा दावा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की या मिळकतीशी कधीही माझ्या वडीलांचा किंवा माझा हक्क संबंध नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपासाचे प्रतिज्ञापत्र खोटे आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**
**सही/-**

**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. १४/०३/२०२४**